# भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई, जि. बीड

# विद्यासभा

# त्रैवार्षिक शिक्षण शिबीर

# अहवाल

## दिनांक : २५ ते २७ डिसेंबर २०२१

## स्थळ : रेनिसन्स सीबीएसई स्कूल, लातूर.

## श्री केशवराज शैक्षणिक संकुल, लातूर.

# प्रस्तावना

सामाजिक बांधिलकी व राष्ट्रहीत ही आपल्या संस्थेची आधारभूत तत्वे आणि उद्दीष्ट्ये आहेत. या उद्दिष्टांसाठी संस्था जे कार्य करते ते संपूर्ण कार्य हेच विद्यासभेचे कार्य आहे.

यासाठी विद्यासभेमार्फत उपक्रमांच्या रचनेतून जे घडेल ते समाज व शिक्षण क्षेत्रासाठी उपयुक्त आहे. याची खात्री देता येईल इतके ते खरे आहे. यासाठीचे प्रयत्न आणि दिशाही अगदी योग्य सुरू आहेत.

या सर्व उपक्रमांचे प्रत्यक्ष चालन करणारा घटक म्हणजे शिक्षक होय. शिक्षकांची विषय समृद्धी व्हावी. कार्यकुशल व्हावेत तसेच परिश्रम घेण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून संस्था सतत प्रयत्नशील असते.

विद्यासभा आयोजित 'त्रैवार्षिक शिक्षण-शिबीर' संस्थेच्या प्रयत्नांचे फलित आहे.

संस्थेतील सर्व संस्कार केंद्रातील सर्व कर्मचारी, पदाधिकारी एकत्र येतात. अनेक विषयांवर चर्चा, परिसंवाद व विचार विनिमय होतो. विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शकांना आमंत्रित केले जाते. ही एक वैचारिक मेजवानीच असते. या अपूर्व सोहळ्यातून नवीन ऊर्जा मिळते. शिक्षक नव्या उमेदीने कार्यमग्न होतात.

धन्यवाद !

## अनुक्रमणिका

१. कार्यक्रमपत्रिका

२. सत्रनिहाय अहवाल

३. साध्य / समारोप

४. अभिप्राय

५. बातम्या

## सत्र १ ले - उद्घाटन सत्र

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईच्या केंद्रीय विद्यासभा आयोजित 'त्रैवार्षिक शिक्षण शिबीराची' सुरूवात दिनांक २५/१२/२०२१ शनिवार रोजी सकाळी ९.०० वा. उद्घाटन सत्राने झाली.

राष्ट्रचेतना सप्ताहातील एक भाग म्हणून राष्ट्रचेतना या संकल्पनेवरील आयोजित या दोन दिवसीय शिबीराची नियोजित सत्र १ ते ११ नियोजनपूर्वक मांडण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी आयोजित राष्ट्रचेतना शिबीर आणि त्रैवार्षिक शिक्षण शिबीर हे श्री केशवराज शैक्षणिक संकुलातील रेनिसन्स सीबीएसई स्कूल, माचिले मळा, डी-मार्ट जवळ, लातूर येथील भव्य अशा एकाच मंचावर सादर झाले.

या सत्रासाठी अध्यक्ष मा.श्री. किरणराव भावठाणकर (अध्यक्ष, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई), उद्घाटक मा. सौ. मंजूश्री सरदेशपांडे (अखिल भारतीय उपाध्यक्षा, विद्याभारती उच्चशिक्षा संस्थान) यांची उपस्थित होती.

मा.श्री. नितीनजी शेटे (कार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. प्रकाशराव जोशी (संयोजक, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. चंद्रकांतराव मुळे (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. अप्पाराव यादव (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. बाबुराव आडे (मुख्याध्यापक प्रतिनिधी, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. विष्णु सोनवणे (मुख्याध्यापक प्रतिनिधी, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. महेश कस्तुरे (सहसंयोजक (माध्यमिक) विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. सतीश हिवरेकर (सहसंयोजक, (महाविद्यालय) विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई)

या सर्वांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

भा.शि.प्र.संस्थेच्या गीतमंच शिक्षक समूहाने सादर केलेल्या 'नव युग की नव गती नव लय हम, साध रहे होकर निर्भय । मुक्त कंठ से दसों दिशा में, गुंजे भारत माँ की जय' या शिबीर गीताने आणि सामुहिक गायनाने उत्साही वातावरणनिर्मिती झाली. या सत्राला उपस्थित सन्माननीय पदाधिकाऱ्यांच्या परिचय प्रा.श्री. दीपक देशमुख यांनी दिला. शिबीर संकल्पना मा.श्री. महेश कस्तुरे यांनी विशद केली.

भावी पिढी चारित्र्य संपन्न व्हावी, राष्ट्रसेवा करण्यासाठी संस्कार व्हावेत हा उद्देश ठेवून राष्ट्रचेतना सप्ताह अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रचेतना शिबीराचे आयोजन करण्यात आले. याच मंचावर राष्ट्रचेतना ही संकल्पना घेऊन संस्थेच्या शिक्षकांद्वारे हे कार्य घडण्यासाठी चिंतन व्हावे यासाठी या शिबीरातील सर्व सत्रांचे नियोजन आखणी केलेली आहे. विद्यासभे मार्फत आयोजित या शिक्षण शिबीरात संस्थेचा कुलधर्म, कुलाचार, आचार्यधर्म, व्यवहार, शैक्षणिक गुणवत्ता याचा समावेश असतो. अतिशय कमी कालावधीत पूर्वनियोजन व पूर्णतयारी करून नियोजित केलेली वंदेमातरम्, राष्ट्रध्वज व राजमुद्रा, क्रांतिकारक, संस्था कार्यकर्ता, सी.बी.एस.ई. स्कूल इमारत लोकार्पण सोहळा यासारखी सत्रे सर्वांसाठीच उपयुक्त ठरणारी आहेत.

शिक्षकांच्या विकासाच्या आराखड्याचे व वैचारिक शिदोरीचे हे शिबीर व्यासपीठ आहे. यावेळी श्री. संतोष बीडकर यांनी समाज जीवन भरूनी टाकू हे वैयक्तिक पद्य सादर केले.

उद्‌घाटक मा. श्रीमती मंजूश्री सरदेशपांडे यांनी आपल्या मनोगतात उपस्थित सभागृहाला उद्‌बोधन केले. बदलत्या शिक्षण व्यवस्थेत शिक्षकांची भूमिका नेमकी कशी असावी हे सांगीतले. विचार प्रवर्तक विद्यार्थी घडविण्यासाठी, त्यांच्यातील कुतूहल जिज्ञासा जागृत करण्यासाठी शिक्षकांनी स्वतः ज्ञानाने अद्ययावत असणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी पाठ शिकवून हे होणार नाही तर याला कृती, सक्रिय सहभागाची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांमध्ये जगभरातल्या ज्ञानाचा व्यापक दृष्टिकोन

तयार करणे, त्यातील आव्हानांना सामोरे जाण्याच्या क्षमता निर्माण होण्यासाठी शिक्षकाने कायम प्रयत्नशील असले पाहिजे.

अध्यक्षीय समारोप मा.श्री. किरणराव भावठाणकर, त्रैवार्षिक शिक्षण शिबीर म्हणजे एकत्रीकरण, उत्सव, भव्य कार्यक्रमाचे स्वरूप नाही. ही केवळ व्यवस्था आहे. शिक्षक कार्यकर्ता आणि संस्था पदाधिकारी यांच्यासाठी वैचारिक आदान-प्रदान करण्याचे सुयोग्य, व्यवस्थित माध्यम म्हणजे विद्यासभा आयोजित त्रैवार्षिक शिक्षण शिबीराची रचना आहे.

नित्य निरंतर चालत आलेली ही यंत्रणा आणि आवश्यक प्रक्रिया आहे. नवीन बदल, नवीन शिक्षक संस्थेशी जोडले जातात त्यांना संस्थेचे उद्दीष्ट्ये व योग्य परिचय करून देणे. कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना कृतीप्रवण होण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय अगदी सर्वार्थाने चिंतन व्हावे व प्रेरणा मिळावी ही शिदोरी पुढील कार्यकाळासाठी उपयुक्त ठरावी या दृष्टिने शिबीराचे महत्त्व अबाधित आहे. तसेच पूर्वापार चाल आलेल्या आयामांचे दृढीकरण होण्यासाठी, सिंहावलोकन करण्यासाठी, नवीन बदल, विचार स्विकारण्याची मनोभूमिका तयारी, प्रगतीचा विचार समोर ठेवून शिक्षक कार्यकर्त्यांनी स्वतःहून पुढे यावे. राष्ट्रासाठी माणूस घडणीच्या कार्यात संस्थेच्या माध्यमातून शिक्षक या भुमिकेतून काय करता येईल? याचा विचार अंतःकरणात कायम तेवत ठेवून कृती स्विकारावी. ज्यायोगे आपली संस्था ध्येयाकडे वाटचाल करू शकेल, चढता आलेख कायम ठेवू शकेल. श्री. माधव जोशी यांनी ऋणनिर्देश व्यक्त केले.

**सत्र संयोजक -** स्वा. सावरकर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, बीड.

**सूत्रसंचालन -** श्री. विठ्ठल काळे.

**वृत्तलेखन -** श्रीमती गौरी डावखरे.

# सत्र २ रे - लोकार्पण सोहळा

रेनिसन्स सीबीएसई स्कूल, लातूर या नवीन भव्य इमारतीचा लोकार्पण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## सत्र ३ रे

**अ) मार्गदर्शन सत्र**

**ब) सेवानिवृत्तांचा गौरव**

**क) आचार्य धर्म**

या तीन आयामांचे आयोजन तिसऱ्या सत्रात करण्यात आले.

### अ) मार्गदर्शन सत्र -

शैक्षणिक मार्गदर्शनासाठी प्रमुख मार्गदर्शक मा.श्री. महेशजी पालकर (शिक्षण संचालक, माध्यमिक विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे) यांची उपस्थिती होती. तसेच या सत्रासाठी मा.डॉ.श्री. सुरेंद्रजी आलुरकर (अध्यक्ष, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) व मा.श्री. चंद्रकांतजी मुळे (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) यांची प्रमुख उपस्थिती होती.

मा.श्री. महेशजी पाटील (संचालक, सल्लागार समिती, अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य) हे विशेष उपस्थित होते.

परिचय, स्वागत व सूत्रपात श्रीमती वर्षा मुंडे यांनी केला. शिक्षकांच्या शैक्षणिक जीवनातील विविध क्षेत्रांशी समायोजन साधण्यासाठी या क्षेत्रातील अडचणी सोडवून प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी शैक्षणिक समुपदेशन तसेच मार्गदर्शनाची आवश्यकता असते. प्रत्येक टप्प्यावर शिक्षक हा समन्वयक असतो. शाळा, समाज, संस्था, शासन, विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या परस्पर आंतरक्रियांमधून हे सजगपणे घडणे आवश्यक असते. या विषयाची मार्गदर्शक मांडणी सर्व शिक्षकांना आवश्यक असते. मार्गदर्शक - मा.श्री. महेशजी पालकर यांनी आपल्या मनोगतात सुरूवातीला 'त्रैवार्षिक शिक्षण शिबीर' आयोजनाबद्दल भा.शि.प्र.संस्थेच्या सर्व पदाधिकारी व विद्यासभेच्या पदाधिकारी यांचे विशेष कौतुक केले. तसेच शिक्षण शिबीर हा एक अभिनव उपक्रम आहे. जीवनातील प्रत्येक टप्प्यांवर येणाऱ्या अनुभवातून शिक्षण व

ते शिक्षण देणारी संस्था आहे. ही संस्था राष्ट्र उभारणीचे कार्य करते.

विद्यार्थ्यांमधील गुणधारकता शिक्षक ओळखू शकतो म्हणून प्रत्येक शिक्षकाने या दृष्टिने ज्ञानसमृध्द व्हावे. इ. १० वी चे विद्यार्थी, त्यांचा उच्चांकी निकाल लावणारी शाळा खरेच अभिमानास्पद आहे. अंकातील गुणात्मक वाढीसोबत सामाजिक, राष्ट्रीय संस्कार करणारे ही संस्था केंद्र आहे. तसेच मार्गदर्शनात त्यांनी शिक्षकांचा शैक्षणिक विकास, व्यक्तिमत्व विकासाचे महत्व अधोरेखित करून शासन स्तरावरील सहकार्यातून संस्थेचा विकास कसा होवू शकतो. केवळ सगळीकडे सीबीएसई पॅटर्न आहे म्हणून योजना नाही तर खरोखर तो अभ्यासक्रम आदर्श पध्दतीने चालविणारी संस्था म्हणून नावारूपास येत आहे. शिक्षकांनी आपल्या कार्यकाळात येणाऱ्या शैक्षणिक अडचणींना सामोरे कसे जावे जेणेकरून समाजातील प्रत्येक विद्यार्थ्यांला त्याच्या ध्येयापर्यंत पोहोचवता येईल हे सांगीतले.

मा.श्री. महेशजी पाटील (शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडणारी एकमेव संस्था आहे. काळाची पावले ओळखून मार्गाक्रमण करणारी संस्था आहे.)

शिक्षकांनी अभ्यासक्रमाचा अभ्यास करावा. एक दृष्टि ठेवून अध्यापनकार्य व्हावे व हे कार्य या संस्थेतील शिक्षक करतात. अध्यक्षीय समारोप - मा.डॉ. सुरेंद्रजी आलूरकर.

## ब) सेवानिवृत्तांचा गौरव -

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्कार केंद्रामध्ये सेवा केलेले प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सेवागौरव सोहळा तिसऱ्या सत्रात पार पडला. या सोहळ्यासाठी मंचावर संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या गौरवसोहळ्यासाठी मा.श्री. विकासराव डुबे (कोषाध्यक्ष, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) हे अध्यक्षस्थानी होते.

मा.डॉ.श्री. सुरेंद्रजी आलुरकर (अध्यक्ष, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. राधेशामजी लोहिया (उपाध्यक्ष, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. नितीनजी शेटे (कार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. किरणराव भावठाणकर (अध्यक्ष, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. चंद्रकांतराव मुळे (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.डॉ.सौ. कल्पनाताई चौसाळकर (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई)

मा.डॉ.श्री. हेमंतजी वैद्य (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई)

यांची प्रमुख उपस्थिती होती.

या गौरव सोहळ्यासाठी ४७ सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. मागील पाच वर्षापासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या एकूण ८३ होती.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्तांचा गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय समारोप - मा.श्री. विकासराव डुबे.

## क) आचार्यधर्म व भा.शि.प्र.संस्था -

या सत्रासाठी मा.डॉ.सौ. कल्पनाताई चौसाळकर (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. तसेच या सत्रासाठी वक्ते मा.श्री. किरणराव भावठाणकर (अध्यक्ष, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) हे उपस्थित होते. या सत्रासाठी सूत्रपात श्री. श्रीकांत देशपांडे यांनी केले.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून, त्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी उपक्रमाची आवश्यकता, अंमलबजावणीसाठी शिक्षक, कार्यकर्त्यांची धडपड, सर्वांगीण व अपेक्षित समाज निर्मितीचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कार्यरत असणारा शिक्षक कार्यकर्ता घडविणे अशा उपक्रमांच्या कार्यवाहीसाठी विद्यासभा निर्मिली आहे.

**वक्ता मार्गदर्शन - मा.श्री. किरणराव भावठाणकर** -

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेची निर्मिती ज्या उद्देशाने झाली आहे. ते उद्देश साध्य करण्यासाठी जे कुलधर्म, कुलाचार आहेत त्यांचे दृढीकरण तर आवश्यकच आहे. या सोबत नवीन शिक्षक कार्यकर्त्यांना त्याची माहिती होणे आवश्यक आहे. या ध्येयासाठी विचारांचे संक्रमण घडवून आणणे हे देखील संस्था उभारणी पासून सुरू आहे. ते पुढेही सुरू ठेवणे आवश्यक आहे.

या शिक्षक कार्यकर्त्यांची विचारांची बैठक तयार करण्यासाठी त्यांचा आचार्यधर्म सांगण्यासाठी वारंवार विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यासभा, संस्था काम करते. यासाठी विद्यासभा सुध्दा काळानुरूप स्वरूप बदलते, स्विकारते. भा.शि.प्र.संस्थेचा शिक्षक हा राष्ट्रीय विचारांचे वहन करतो. वसुधैव कुटूम्बकम ही संकल्पना विद्यार्थ्यां मध्ये रूजवण्यासाठी प्रयत्न करतो. या पध्दतीने व्यक्ती निर्माणाची आवश्यकता ही राष्ट्रनिर्मितीसाठी आहे.

**अध्यक्षीय समारोप - मा.डॉ.सौ. कल्पनाताई चौसाळकर -**

दिवसभरातील झालेल्या सत्राच्या संदर्भात आढावा सांगितला. प्रत्येक सत्रामधून नेमके काय घेणे अपेक्षित व त्यांचे साध्य सांगीतले या सोबतच संस्थेचे पाईक म्हणून सर्वांनी काम करावे असे आवाहन केले. शिक्षकांमध्ये काळानुरूप क्षमतांचा विकास होणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये संवेदना जागृतीचे कार्य करावे. आपण गतव्यवस्थाना पर्यंत पोहोचलो आहोच तेथे टिकून राहण्यासाठी आता प्रयत्न आवश्यक आहेत.

वैयक्तिक गीत श्री. जयेंद्र कुलकर्णी यांनी सादर केले.

वृत्तांकन श्री मंगेळ मुळी यांनी केले. या सत्रासाठी सत्रसंयोजन करणारे संस्कार केंद्र श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई हे होते.

ऋणनिर्देश श्री. ज्ञानेश मातेकर यांनी व्यक्त केले.

# सत्र - ४ थे - भारत रक्षा मंच

या सत्रासाठी अध्यक्ष म्हणून मा.डॉ.श्री. हेमंतराव वैद्य (सहकार्यवाह, भा.शि.प्र. संस्था, अंबाजोगाई) यांनी अध्यक्षस्थान भुषविले होते. या सत्रासाठी मार्गदर्शक वक्त्या म्हणून मा.सौ. बिनाताई गोगरी (राष्ट्रीय अध्यक्ष, भारत रक्षामंच महिला प्रकोष्ठ) या उपस्थित होत्या.

**सूत्रपात - सौ. वर्षा मुंडे**

भारत रक्षा मंच परिचय, उद्देश या कार्याचा विस्तार आलेख मांडणी, देशांतर्गत समस्या, येऊ घातलेली संकटे, भारत देशाचे नागरिक या नात्याने हे माहिती असणे आवश्यक आहे. या विषयाच्या निमित्ताने आपल्या शिक्षक कार्यकर्त्यांचे चिंतन व्हावे. राष्ट्रहितासाठी कार्यप्रवण होऊन सक्रियता वाढवावी ही अपेक्षा ठेवून व भूमिका घेऊन भारत रक्षा मंच विषय मांडणी आहे.

**विषय मांडणी - मा. सौ. बिनाताई गोगरी**

बांग्लादेशी घुसखोरी सारखे विषय आपल्या देशात सिमांतर्गत अनेक संकटे, समस्या निर्माण होत आहेत. या विषयीची जनजागृती, तसेच संघप्रचारक सूर्यकांत केळकर गुरूजींच्या कार्याचा उल्लेख करून राष्ट्रहिताची तळमळ स्पष्ट केली. उपस्थितांपैकी कितीजणांनी NRC, CAA या विषयी माहिती आहे, ज्ञात आहे या सोबतच हे माहिती करून घेणे व त्यांची आवश्यकता समजावून सांगितले. संस्थेच्या शिक्षकांच्या समाजसंपर्कातून हा विषय अनेकजणापर्यंत पोहचू शकतो व पोहचवावा अशी अपेक्षा व्यक्त केली. भारत रक्षा मंचच्या कार्यासाठी पुढाकार घ्यावा, स्वतःहून पुढे यावे व याची माहिती / कार्य याला सुरूवात करावी. तसेच भारत रक्षा मंचच्या वतीने जिल्हा, राज्य, केंद्र पातळीवरील प्रयत्न कश्या पध्दतीने सुरू आहेत हे सांगीतले.

**अध्यक्षीय समारोप - मा.डॉ. श्री. हेमंतजी वैद्य**

भारत देशाचे नागरिक या नात्याने राष्ट्रहितासाठी घटक बनून कार्य केले पाहिजे. राष्ट्रउभारणीसाठी आचार-विचार आण योग्य कृती अत्यंत महत्वाची असून आपण शिक्षक म्हणून देशावर येणाऱ्या संकटासाठी, समस्यांसाठी जनजागृती करून त्या समस्या सोडविण्यासाठी योगदान दयावे.

**स्वागत परिचय - सौ. रूपाली कुलकर्णी**

**वृत्तलेखन - डॉ. सुनीता कुरूडे**

**सत्रसंयोजन - स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड**

## सत्र - ५ वे - स्वातंत्र्य काळातील क्रांतिकारकांचे योगदान

या सत्रासाठी मा.श्री. विजयराव चाटूफळे, अध्यक्ष (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) तसेच वक्ते मा.श्री. मोहनजी शेटे (सदस्य, शालेय पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य) हे उपस्थित होते.

**स्वागत, परिचय - श्रीमती सुनंदा खांडेकर**

**सूत्रपात - श्री. विजयेंद्र चौधरी**

भारतीय मातृभूमी वीर सुपुत्रांची भूमी आहे. तसेच भारत भूमी थोर क्रांतीकारकांची जननी आहे. या भूमीमतील शूरवीर, क्रांतिकारक, थोर लढवय्ये यांनी मातृभूमीच्या रक्षणार्थ आपल्या प्राणांची आहुती दिली.

शत्रूच्या जाचातून मातृभूमीला मुक्त करण्यासाठी या थोरांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी या धगधगत्या स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून देऊन शोर्याच्या, त्यांच्या थोर पराक्रमांच्या कथा व प्रसंग आजही आपल्या मनाला भारावून टाकतात. प्रत्येक भारतीयांचे एकच ध्येय होते ते म्हणजे भारताचे स्वातंत्र्य. परकीयांच्या जाचातून भारत मातेला मुक्त करून भारतीय जनतेला स्वातंत्र्य मिळवून देणे. हे स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या क्रांतिकारकांचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे.

**वैयक्तिक पद्य - श्री. मुकूंद मिरगे**

**मार्गदर्शन - मा. श्री. मोहनजी शेटे**

१८५७ पासूनचे स्वातंत्र्य लढे यात सक्रिय सहभागी असलेले क्रांतिकारक नानासाहेब पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, वासुदेव बळवंत फडके, रानडे, बिरसा मुंडा, सावरकर, मदनलाल धिंग्रा, राजगुरू या सारख्या अनेक क्रांतीकारकांच्या आयुष्यातील प्रसंग, उदाहरणे, देशभक्तीचे कार्य, जीवनपट अगदी थोडक्यात पण प्रेरणादायी, भावपूर्ण व देशभक्तीने ओतप्रोत अश्या प्रभावी शब्दांची

मांडणी करून अतिशय छान पध्दतीने मांडला. या मध्ये २४ व्या वर्षी लढलेली झाशीची राणी, घरातील वातावरण देशभक्तीचे नसताना घडलेली मदनलाल धिंग्रा यांची देशसेवा, सावरकरांचे विचार व कृती, नानासाहेब पेशव्यांचे इंग्रजांना दिलेली सडेतोड उत्तर. या सत्रात सर्व क्रांतिकारकांचे स्मरण करून इतिहासातील सामर्थ्यकथा वर्तमानात कश्या पध्दतीने प्रेरित करू शकतात हे सांगीतले. इतिहास कायम लक्षात ठेवणे याला अनन्यसाधारण महत्व आहे. इतिहासाच्या ज्ञानामुळे व अभ्यासामुळे गद्दारी करण्याचे धाडस होत नाही.

**अध्यक्षीय समारोप - मा.श्री. विजयराव चाटूफळे**

शिक्षकांनी आपल्या अध्यापनातून अश्या क्रांतिकारकांचा परिचय करून देवून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती निर्माण करावी, संस्थेच्या माध्यमातून हा विषय समाजापर्यंत पोहचवावा.

**ऋणनिर्देश - श्री. लक्ष्मीकांत बुगदे**

**वृत्तलेखन - श्री. शिवशंकर भंडारे**

**सत्र संयोजन - श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगाव**

## सत्र - ६ वे - वंदे मातरम्

या सत्रासाठी मा.श्री. राधेश्यामजी लोहीया (उपाध्यक्ष, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) उद्घाटक होते. तर मार्गदर्शक वक्ते म्हणून मा.श्री. मिलिंदजी सबनीस (कला शिक्षक, ज्ञानदा प्रशाला, पुणे) हे उपस्थित होते. त्यांनी वंदे मातरम् या विषयाची मांडणी केली. उपस्थित मान्यवरांचा परिचय सौ. अर्चना गोवर्धन सुरशेटवार यांनी करून दिला.

या सत्राच्या सुरूवातीला भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या गीतमंच या शिक्षक समूहाने श्री. जयेंद्र कुलकर्णी यांच्या सोबत स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कवितांचा श्रवणीय असा गायनाचा कार्यक्रम सादर केला. या मध्ये सौ. श्रुती देशपांडे यांचा सहभाग होता.

श्री. सुरेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे नेणारा मुलमंत्र तसेच क्रांतीकारकांच्या तोंडी बसलेला हा प्रेरणादायी मंत्र, स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी चेतना जागवणारा मंत्र. बलिदान, त्याग, समर्पण, सर्वस्वपणास लावणारी संस्कृती, भारतमातेचे वर्णन गीत, सर्वव्यापी स्वरूपाचे दर्शन घडवणारे गीत. वंदे मातरम् मधील माता मातृभुमी आहे. ती अनंतस्वरूपी सर्वश्रेष्ठ आहे. नमनात्मक स्वरूप, भूमिची समृद्धी, सामर्थ्य वर्णन आहे.

**मार्गदर्शक मांडणी - मा.श्री. मिलिंदजी सबनीस -**

हमारे लिए यह देश का टुकडा नही है । या अटलबिहारी वाजपेयींच्या काव्यपंक्तीने वक्तव्याला सुरूवात झाली. वंदेमातरम् गीताच्या निर्मितीपासून ते आताच्या विविध चालीपर्यंतचे अनेक स्वरूप, अर्थ आणि काय योग्य/अयोग्य स्पष्टीकरणासहित सांगितले. चित्रफीतीच्या माध्यमातून वंदे मातरम्चा इतिहास हळूहळू उलगडत गेला. अगदी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी ज्या ठिकाणी बसून हे गीत

लिहिले ते थळ, उपस्थितांना समरस करत चढत्या क्रमाने या सत्राची मांडणी झाली. शब्द हे शस्त्र आहेत आणि हे शस्त्र देशाचा इतिहास घडवू शकतात. हे वंदे मातरम् या गीताने, भारताने सिध्द करून दाखविले आहे. त्यांनी वंदे मातरम् या गीतातील प्रत्येक शब्दाचा अर्थ स्पष्ट केला.

अध्यक्षीय समारोप - मा.श्री. राधेश्यामजी लोहिया यांनी केले.

वृत्तलेखन सौ. तोटावार यांनी केले. ऋणनिर्देश श्री. गोविंद वाघमारे यांनी केले. या सत्र संयोजनाची जबाबदारी प.पू. गोळवलकर गुरूजीं शैक्षणिक संकुल, देगलू यांच्याकडे होती.

# सत्र - ७ वे - राष्ट्रध्वज व राजमुद्रा

या सत्रासाठी अध्यक्षस्थानी मा.श्री. विष्णू सोनवणे (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) तसेच प्रमुख वक्ता मा.श्री. मिलिंदजी सबनीस यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वागत व परिचय प्रा. दत्तप्रसाद गोस्वामी यांनी केले. तर सूत्रपात डॉ.श्री. दिगंबर मुडेगावकर यांनी केले. राष्ट्रीय ध्वज हे एखाद्या देशाचे चिन्ह असते. देशाची ओळख म्हणजे त्या देशाचा ध्वज असतो. ध्वजावरील प्रतिके पाहून तो देश ओळखला जातो. एखाद्या दस्तऐवजाचा अधिकृतपणा दर्शविणारे चिन्ह म्हणजे राजमुद्रा, प्राचीन काळापासून राजमुद्रेचा वापर केला जात आहे.

वैयक्तिक पद्य - चि. चैतन्य आहेर यांनी सादर केले.

**मार्गदर्शन - मा.श्री. मिलिंदजी सबनीस**

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाने राष्ट्रीय मानचिन्ह राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राष्ट्रभाषा ठरवल्या आहेत. प्राचीन काळापासून ब्रम्हध्वजपासून अग्निदेवतेचा ध्वज, वरूणाचा ध्वज आहे.

अजिंठा लेण्यातही ध्वज आहे. समुद्रगुप्त - गरूडध्वज, निष्पता का ध्वज. रामायण महाभारतात ध्वज, महाराणा प्रतापचा ध्वज हा चांगी ध्वज आहे, सूर्य प्रतीक आहे. मोघलध्वज, आत्मध्वज, वारकरी पंथ, शिवरायांचा ध्वज, भगवा ध्वज, ईस्ट इंडिया कंपनीचा ध्वज. १८५७ चा भारतीय ध्वज - भाकरी व कमळ आहे. या प्रकारे आतापर्यंत ध्वजाचे बदलते स्वरूप, अर्थ त्या मागच्या कथा, व्यक्ती, प्रसंग, स्पष्टीकरणासहीत सांगीतले.

अध्यक्षीय समारोप - मा.श्री. विष्णू सोनवणे

ऋणनिर्देश - प्रा.डॉ. देविदास खोडेवाड यांनी व्यक्त केले.

वृत्तलेखन - प्रा. गौतम गायकवाड यांनी केले.

सत्र संयोजन - श्री. खोलेश्वर महाविद्यालयाकडे होते.

## सत्र - ८ वे - कार्यकर्ता प्रशिक्षण

मा.डॉ.श्री. विवेक पालवणकर (कार्यवाह, स्थानिक समन्वय समिती, स्वा. सावरकर शैक्षणिक संकुल, बीड), सत्रअध्यक्ष तसेच मा.श्री. योगेशजी सोमण (संचालक, ॲकॅडमी ऑफ थिएटर, आर्टस्, मुंबई विद्यापीठ) वक्ता म्हणून लाभले होते. मान्यवरांचा परिचय श्री. समीर मुळी यांनी केला.

या सत्राच्या सुरूवातीला संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करण्यात आले. या छोटेखानी प्रकाशन सोहळ्यासाठी विद्यासभेचे पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

या मध्ये डॉ. संगीता ससाणे, इंडियन डायस्पोरा ॲण्ड हयुम्यानिझम फेमिनिस्टक परस्पेटीव्ह संशोधनात्मक पुस्तक. डॉ. मेधा गोसावी-चंद्र माझा चांदण्यात- कवितासंग्रह, सद्‌गुरू अच्युताश्रम स्वामीकृत अभंगगाथा-संशोधनात्मक ग्रंथ, डॉ. सोपान सुरवसे-बाबाराव मुसळे-व्यक्ती आणि वाङ्‌मय. संशोधनात्मक ग्रंथ इत्यादी ग्रंथसंपदेचे प्रकाशन झाले. मान्यवरांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. 'चाह मेरी यह की मै जागता रहू' हे वैयक्तिक गीत श्री. जयेंद्र कुलकर्णी यांनी सादर केले.

सूत्रपात डॉ.विकास बोरगावकर यांनी केला. स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्षे, क्रांतीकारक संताचे, कलाकारांचे योगदान, स्वत्वाची ज्योत कायम ठेवत स्वातंत्र्याची उर्मी निर्माण करण्याचे कार्य. स्वातंत्र्याचे मूल्य व सर्वांचे समर्पण नवीन पिढीला माहितीसाठीचे देशाच्या प्रगतीत हातभार असावा. ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे. उपक्रमांची घोषणा-आखणी, देशाविषयी प्रेम रूजवणे. देशभक्ती सोबतचे प्राप्त केलेली विद्या. देशाच्या करणी लावण्याचे उपक्रम.

**मार्गदर्शन - मा.श्री. योगेशजी सोमण.**

संघाच्या संस्कारातून जडण-घडण झाली की, सातत्य आणि चिकाटीचे संस्कार

होतात. पुस्तकी ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांवर संस्कार महत्त्वाचे आहेत. आपल्या मानबिंदूची मानखंडना होत आहे तर आपण जागे झाले पाहिजे. प्रचंड वाचनाचे व्यसन लावून घेतले पाहिजे. आपल्या संस्कारांना प्रतिबिंबीत करावे. प्रसारमाध्यमे आणि चित्रपटाबद्दल डोळसपणे पाहण्याची दृष्टि निर्माण झाली पाहिजे.

बाजीप्रभू देशपांडे यांच्यासारखे खिंडीत लढणारे कार्यकर्ते असावेत. स्वा. सावरकरांचे विचार लेखनातून, आचरणातून शिक्षक कार्यकर्त्यांनी जपावेत. सजग नागरिक घडविण्याचे संस्कार गुरू करू शकतो. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ कार्यक्रम प्रत्येकाने घ्यावेत.

**अध्यक्षीय समारोप - मा.श्री. डॉ. विवेकजी पालवणकर**

सातत्याने चांगले विचार सांगावे लागतात. स्वतः पोहता-पोहता पोहायला शिकवावे लागते. या सारखी परिस्थिती निर्माण झाली. तरी खंबीरपणे, कृतीशील रहावे लागते. सरसंघचालक पू. मोहनजी भागवत यांनी सांगीतलेला कार्यकर्ता हितोपदेश आपण आचरणात आणावा तसेच श्रध्देय दत्तोपंतजी ठेंगडी यांचे कार्यकर्ता पुस्तक आणि या पुस्तकातील कार्यकर्ता होणाऱ्या महत्वाच्या पायऱ्या आवश्यक आहेत.

ऋणनिर्देश श्री. कमलकिशोर लड्डा यांनी केले. वृत्तलेखन प्रा. ज्ञानेश्वर गवते यांनी व्यक्त केले. या सत्रसंयोजनाची जबाबदारी श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव यांची होती.

## सत्र ९ वे - विकसता विकसता विकसावे...

या सत्रासाठी मा.श्री. अमरनाथ खुर्पे (कार्यवाह, स्थानिक समन्वय समिती, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुल, माजलगाव) हे अध्यक्षस्थानी होते. तर मा.श्री. नितीनराव शेटे (कार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) हे प्रमुख वक्ते होते. मा.श्री. चंद्रकांतजी मुळे (कार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांचा परिचय सौ. अर्चना गिरवलकर यांनी केला. सूत्रपात श्री. सुदाम कोल्हारे यांनी केला. भारतीय शिक्षणाचे बाळकडू घेऊन राष्ट्रपुरूष घडावा, राष्ट्रघडणीसाठी शिक्षण हे साधन मानून आपल्या शिक्षण संस्थेची निर्मिती झाली. या निर्मितीतून साकार झालेल्या कार्याचे आलेख उदयोन्मुख पिढीपुढे साक्षात आहेत. संस्थेचे संचालन व संवर्धन करणाऱ्या विद्यार्थी, पालक, शिक्षक, पदाधिकारी यांच्यासाठी ही संस्था जिव्हाळ्याचा विषय व्हावा. आत्मियतेने प्रत्येक जबाबदारी पार पडावी ही प्रक्रिया इथे विकसता विकसता विकसावे या पध्दतीनेच नित्य घडते आहे. यापुढेही याच विचारांनी मार्गक्रमण करण्याचे निर्देश देणारे, एकमेकांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन भविष्याचा वेध घेत पुढील वाटचालीसाठी निर्धारीत अभिवचन घेण्याचे चिंतन करण्यासाठी हे व्याख्यान आयोजित केले आहे.

हे जन्मभूमी भारत... हे वैयक्तिक पद्य सौ. कांचन तोडकर यांनी यावेळी सादर केले.

**मार्गदर्शन - मा.श्री. नितीन शेटे**

संस्थेस ७० वर्षाची शिक्षण शिबीराची परंपरा लाभलेली आहे. राष्ट्रचेतना शिबीराच्या आयोजनामागील भूमिका ‘व्यक्ती निर्माणातून राष्ट्रनिर्माण’ या तुकडोजी महाराजांच्या विचारांची सिद्धी करण्याची भूमिका यातून ग्रामगीतेचे वाचन, प्रचार व

प्रसार होतो. समाजाचा संस्थेकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्याचे कारण आपला इतिहास आहे. भौतिक सुविधांची वाढ म्हणजे विकास नाही. आपला विचार मुक्तपणे समाजापर्यंत पोहचविण्याच्या हेतूने संस्थेची स्थापना, विकास ही अविरत चालणारी स्थिती आहे. प्रत्येकाने आपली भूमिका समजून घेऊन ती समर्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न करावा.

Who I am ? स्वत:ला ओळखायला शिका ! आपली उद्दीष्ट्ये कायम आपल्या समोर असावीत. ध्येयाकडे मार्गक्रमण करताना प्रलोभने, मोह यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. लोकांना जे आवडतं ते देण्यासाठी नाही तर जे देणे आवश्यक आहे ते देण्यासाठी आपण (संस्था) आहोत. हे शिबीर केवळ शिक्षकांसाठी नसून संस्थेच्या प्रत्येक घटकांसाठी आहे. आपल्या उणीवा दूर सारून संस्थेची ध्येयं पूर्ण करण्यासाठी झटणे म्हणजे विकास होय. संस्थेचे स्वायत्त विद्यापीठ निर्माण व्हावे हे उद्दिष्ट्ये आहे. ज्यांना चांगल्या कार्यात योगदान देता येत नाही त्यांनी स्वत:हून बाजूला व्हावे. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेंची पाहिजे' हे ब्रीद सदैव स्मरावे. Give me more हे मा. अडवाणीजींच्या वाक्याप्रमाणे आपल्या सर्वांची मानसिकता व्हावी. प्रत्येकाने PHD केलेली असावी. P - priority, H - honesty, D - devotion.

मै नही तूम ! प.पू. गोळवलकर गुरजी यांच्या विधानाप्रमाणे आपला प्रवास असावा आणि मै नही हम ! हा भाव प्रत्येकाच्या मनी रूजावा.

**अध्यक्षीय समारोप - मा.श्री. अमरनाथ खुर्पे**

संस्थेतील प्रत्येक घटकात सकारात्मक बदल घडविण्याची दृष्टी संस्थेच्या नेतृत्वाकडे असते. यासाठी या शिबीराचे आयोजन असते. आपल्या संस्थेची सुबत्तेकडे वाटचाल सुरू आहे. पूर्वसुरींनी पाहिलेली स्वप्ने, उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करूयात. सर्वार्थाने स्वत:चा विकास करत असताना आपल्या सोबत इतरांचाही विचार होतोच आणि हा विचार सामूहिकतेला योग्य वळण व दिशा देत असतो.

**ऋणनिर्देश -** श्री. भाऊसाहेब भापकर यांनी व्यक्त केले.

**वृत्तलेखन -** श्री. प्रमोद काकडे यांनी केले.

तर या सत्र संयोजनाची जबाबदारी आर्य चाणक्य विद्यामंदीर, पैठण या संस्कार केंद्राकडे होती.

## सत्र - १० वे - स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव - आपला सहभाग

हे सत्र आयामशः चर्चासत्रामध्ये विभागशः घेण्यात आले. या सत्रासाठी प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, व्यवसाय अभ्यासक्रम, आस्था विभाग, वरिष्ठ महाविद्यालय, इंग्रजी माध्यम शाळा अशा ५ विभागात व ५ सत्रात पार पडले.

### १) प्राथमिक विभाग -

या सत्राचे अध्यक्ष मा.श्री. आप्पाराव यादव (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) तसेच प्रमुख उपस्थिती मा.श्री. गजाननराव जगताप (अध्यक्ष, स्थानिक व्यवस्था मंडळ, स्वा. सावरकर शैक्षणिक सकुंल, बीड) यांची होती.

सूत्रपात श्री. भास्करराव कुलकर्णी, वैयक्तिक गीत 'सागर वसना पावन देवी' , तसेच सांघिक गीत 'नव युग की' घेण्यात आले. वृत्तलेखन श्री. सोपान गोरे यांनी केले. सत्र संयोजन करणारे विद्यालय कै. दत्ताजी भाले प्रा.वि. अंबड हे होते.

**अध्यक्षीय समारोप - मा.श्री. आप्पाराव यादव -**

आयामशः चर्चासत्रात उपस्थित प्राथमिक विद्यालयातील शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवून आझादीका अमृतमहोत्सव निमित्त कोणते उपक्रम/कार्यक्रम घ्यावेत हे सुचविले. या सर्व उपक्रमा संदर्भात मा. अध्यक्षांनी मार्गदर्शन केले. तसेच हे उपक्रम राबविण्याचा उद्देश व आवश्यकता सांगीतली. यातील काही निवडक उपक्रम - ७५ क्रांतिकारकांचा परिचय करून देणे, कार्यावर आधारित कथाकथन स्पर्धा, गड-किल्ले, स्मारक यांना भेट देणे, माहितीचे व्हिडीओ तयार करणे, देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा, क्रांतिकारकांची पुस्तकपेढी, योग शिबीर, वृक्षारोपण, वेशभूषा स्पर्धा, माता-पालक वेशभूषा स्पर्धा, क्रांतिकारकांची चित्रप्रदर्शनी भरविणे, वार्षिक स्नेहसंमेलन क्रांतिकारकांच्या थीमवर आधारित, फलक लेखन, भारत-

भारतीचे पुस्तक संच खरेदी करणे, सैनिकांचे मनोगत, स्वदेशी वस्तूंचा वापर व प्रचार, प्रतिज्ञेचा अर्थ सांगणे, प्रभातफेरी भित्तीपत्रक तयार करणे, भारत माता प्रतिमा भेट म्हणून देणे. शहीद जवानांच्या कुटूंबाचा सत्कार, ७५ विद्यार्थी प्रगत करणे.

**२) माध्यमिक विभाग -**

आयामशः माध्यमिक विभागातील शिक्षकांच्या या चर्चासत्रासाठी मा.श्री. विष्णू सोनवणे, अध्यक्ष तसेच मा.श्री. महेशराव कस्तूरे (सहसंयोजक, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांचा परिचय श्रीमती सत्यभामा मोरे, सूत्रपात-श्री. प्रदीपराव कुलकर्णी, ऋणनिर्देश श्री. कमलाकर झोडगे, वृत्तलेखन श्री. शिवशंकर भंडारे यांनी केले. तसेच सत्रसंयोजनाची जबाबदारी श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगाव यांचेकडे होती.

**श्री. महेशराव कस्तूरे -**

‘स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपला सहभाग’ या विषयाला अनुसरून सर्व संस्कार केंद्रातील शिक्षकांनी सुचविलेल्या वैयक्तिक व सामूहिक उपक्रमाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अमृत महोत्सवी उपक्रम हे सरकारी उपक्रम होऊ नये अशी सूचना वक्त्यांनी आपल्या मनोगतातून केले.

**अध्यक्षीय समारोप - श्री. विष्णू सोनवणे -**

संस्थेतील सर्व शिक्षकांनी ‘मी’ असा उपक्रम घेईन असे सुचवावे. आपण असे केले पाहिजे असे सुचवू नये तसेच सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून अमृत महोत्सव समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचवावा.

**३) कनिष्ठ महाविद्यालय, व्यवसाय अभ्यासक्रम, आस्था विभाग -**

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' आपला सहभाग या आयामशः चर्चासत्रासाठी अध्यक्ष मा.प्रा. चंद्रकांतराव मुळे (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) तसेच प्रमुख उपस्थिती मा.श्री. प्रकाशराव दुग्गड (अध्यक्ष, स्थानिक व्यवस्था मंडळ, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुल, माजलगाव) यांची उपस्थिती होती.

परिचय प्रा. प्रल्हाद तावरे, सूत्रपात - प्रा. शाम बारडकर, ऋणनिर्देश - डॉ. रविंद्र कुंभेफळकर तर वृत्तसंकलन प्रा. चिटणीस सरांनी केले. सत्र संयोजन खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई यांचेकडे होते.

**प्रमुख उपस्थिती मार्गदर्शन -** प्रसिध्द नसलेल्या क्रांतिकारकांच्या माहितीचे संकलन करावे, प्रक्षेत्र भेट (ऐतिहासिक स्थळे) भित्तीपत्रके, पोवाडा, कार्यशाळा, भारतीय शास्त्रज्ञांची ओळख, पत्रलेखन स्पर्धा, देशी वृक्षारोपण करू त्यांना क्रांतिकारकांची नावे देणे या सारखे उपक्रम कार्यक्रमांचे नियोजन उपस्थितांच्या चर्चेमधून सर्वांसमोर आले. तसेच प्रमुख अतिथी यांनी या विषयी सर्वांना मार्गदर्शन केले.

**अध्यक्षीय समारोप - मा. चंद्रकांतजी मुळे -** विविध संस्कार केंद्रातील शिक्षकांनी अमृत महोत्सवानिमित्त करावयाच्या उपक्रमांची दखल घेऊन त्यावेळी मार्गदर्शन केले. विविध संस्कार केंद्रशः सूर्यनमस्काराचे आयोजन तसेच विविध कार्यक्रमाची उपप्राचार्यांनी नोंद घ्यावी एकत्रित पुस्तिका तयार करावी असे सांगीतले.

**४) वरिष्ठ महाविद्यालय विभाग -**

या गटातील चर्चासाठी मा.श्री. किरणराव भावठाणकर अध्यक्ष तथा प्रा.श्री. सतीश हिवरेकर प्रमुख उपस्थितीत होते. परिचय डॉ. सोपान सुरवसे, सुत्रपात गजानन होन्ना, ऋणनिर्देश प्रा. राम. गव्हाणे, सूत्रसंचालन - डॉ. मेधा गोसावी यांनी केले. तसेच या सत्र संयोजनासाठी जबाबदारी स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड यांची होती.

## ५) इंग्रजी माध्यम शाळा विभाग -

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव - आपला सहभाग यातील इंग्रजी माध्यम शाळा विभाग, आयामशः चर्चासत्रासाठी अध्यक्ष मा.श्री. प्रकाशराव जोशी (संयोजक, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) तसेच प्रमुख उपस्थिती मा.श्री. जितेशजी चापसी (कार्यवाह, स्थानिक समन्वय समिती, लातूर) यांची होती.

परिचय - श्री. समीर शेख, सुत्रपात - श्री. कुलदीप मुंडे, ऋणनिर्देश - सौ. योगेश्वरी पुर्भे, वृत्तलेखन - सत्रसंयोजनाची जबाबदारी भेल सेकंडरी स्कूल, परळी वैजनाथ यांचेकडे होती.

## सत्र - ११ वे - समारोप सत्र

## कै. प्रमोदजी महाजन आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण, गौरव सोहळा -

या गौरव सोहळ्यासाठी अध्यक्ष मा.श्री. विकासराव डुबे (कोषाध्यक्ष, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई) तर प्रमुख पाहुणे मा.श्री. योगेशजी सोमण (संचालक, ॲकॅडमी ऑफ थिएटर, आर्टस, मुंबई विद्यापीठ) यांची उपस्थिती होती.

**प्रमुख उपस्थिती -**

मा.श्री. नितीनजी शेटे (कार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. किरणराव भावठाणकर (अध्यक्ष, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई)

मा.श्री. चंद्रकांतराव मुळे (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. अप्पाराव यादव (सहकार्यवाह, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. विष्णु सोनवणे (मुख्याध्यापक प्रतिनिधी, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. प्रकाशराव जोशी (संयोजक, विद्यासभा, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. बाबुराव आडे (मुख्याध्यापक प्रतिनिधी, भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाई),

मा.श्री. जितेशजी चापसी (कार्यवाह, स्थानिक समन्वय समिती, लातूर)

हे मंचावर उपस्थित होते. या सत्राचे सूत्रसंचलन तथा मान्यवरांचा परिचय सौ. अनिता येलमटे, संयोजन समितीचे स्वागत श्री. महेश कस्तुरे, सूत्रपात श्री. प्रकाशराव जोशी, वैयक्तिक गीत श्री. जयेंद्र कुलकर्णी, ऋणनिर्देश श्री. माधव मठवाले तसेच वृत्तलेखन सौ. आरती तेलंग यांनी केले.

समारोप सत्र संयोजनाची जबाबदारी लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय, उदगीर यांच्याकडे सोपविण्यात आली होती.

पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मंचावरील सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यथोचित परिचय सर्वांसमोर देण्यात आला.

शिबीर प्रमुख तसेच केंद्रीय विद्यासभा सहसंयोजन श्री. महेश कस्तुरे यांनी शिबीर संयोजन समितीतील सदस्यांचा सत्कार आयोजनाचे संचालन केले. तसेच या वेळी विशेष शिक्षकांचे सत्कार आयोजित करण्यात आले होते.

**शिक्षण शिबीर संयोजन समिती २०२१ -**

१) प्रा. डॉ. गजानन बाबुराव होन्ना

उपप्राचार्य, सिध्देश्वर वरिष्ठ महाविद्यालय, माजलगाव.

२) श्री. विवेक वामनराव जोशी

सहशिक्षक, श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई.

३) श्री. उमेश गजानन जगताप

सहशिक्षक, स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई.

४) श्रीमती वर्षा लक्ष्मणराव मुंडे

सहशिक्षक, श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई.

५) श्री. नितीन विठ्ठलअप्पा चौधरी

सहशिक्षक, लोकमान्य टिळक विद्यालय, पोखरी, ता. अंबाजोगाई.

**विशेष सत्कार -**

१) श्री. संजय शिवाजीराव गुरव

सहशिक्षक, श्री केशवराज माध्यमिक विद्यालय, लातूर.

२) श्री. कुंदमीर करपुडे

(बी.एस.पी.एस. ॲप व राष्ट्रचेतना शिबीर थेट प्रक्षेपण)

३) श्री. नरसिंग झरे

(अनसरवाडा प्रकल्प - संगणक भेट)

मंचावरील मान्यवरांच्या हस्ते हे विशेष सत्कार करण्यात आले.

**प्रास्ताविक - मा.श्री. प्रकाशजी जोशी -**

शिक्षण शिबीराच्या मध्यवर्ती कल्पनेसंदर्भात भूमिका मांडली. यासंबंधी केलेले प्रयत्न, यातील सर्वांचा सक्रिय सहभाग या सहभागातून नेमके दर्शन, मंथन आणि चिंतन यासाठी केलेली रचना सांगीतली. तसेच अत्यंत कमी कालावधीत रचना पूर्ण केलेले हे शिबीर आहे. हे या शिबीराचे वैशिष्ट्ये आहे. या नियोजनातूनच सर्व सत्रे नियोजित पध्दतीने संपन्न झाली.

आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याविषयी सांगत असताना, कै. प्रमोदजी महाजन आणि आपली संस्था यांचे नाते सांगीतले. तसेच आदर्श शिक्षक पुरस्काराविषयी संस्थेची भूमिका मांडली. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय, शिक्षकेत्तर त्याबरोबर संस्था अंतर्गत चांगल्या शिक्षकांना प्रोत्साहन पुरस्काराची योजना सांगितली. शिबीरासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त केले.

मान्यवरांच्या हस्ते संस्थेतील आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा सपरिवार यथोचित सत्कार करण्यात आला.

**सन २०१९-२० चे कै. प्रमोदजी महाजन आदर्श शिक्षक पुरस्कार -**

**प्राथमिक विभाग - श्री. अंकुश गोरोबा मिरगुडे**

सहशिक्षक, लाल बहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालय, उदगीर.

**माध्यमिक विभाग - श्री. सुनील लक्ष्मीकांत वसमतकर**

मुख्याध्यापक, श्री केशवराज माध्यमिक विद्यालय, लातूर.

**कनिष्ठ महाविद्यालय - प्रा. सुहास कृष्णराव डबीर**

खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई.

**वरिष्ठ महाविद्यालय - प्रा.डॉ.सौ. सुनिता शंकरराव कुरूड**

स्वा. सावरकर वरिष्ठ महाविद्यालय, बीड.

**शिक्षकेत्तर कर्मचारी - श्री. गोविंद सायन्ना कंधारकर**

मुख्य लिपीक, लाल बहादूर शास्त्री मा. विद्यालय, उदगीर.

**संस्था अंतर्गत प्रोत्साहनपर पुरस्कार - श्री. सुनिल गणेश बोतकुलवार**

भेल सेकंडरी स्कूल, परळी वैजनाथ.

**सन २०२०-२१ चे कै. प्रमोदजी महाजन आदर्श शिक्षक पुरस्कार -**

**प्राथमिक विभाग - श्रीमती विजयमाला जालिंदर जगताप**

स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालय, बीड.

**माध्यमिक विभाग - सौ. जयश्री वामनराव इटकुरकर**

मुख्याध्यापक, श्री केशवराज माध्यमिक विद्यालय, लातूर.

**कनिष्ठ महाविद्यालय - प्रा. डॉ. राजेश जयराम भुसारी**

स्वा. सावरकर किमान कौशल्य विभाग, बीड.

**वरिष्ठ महाविद्यालय - प्रा. डॉ. गजानन बाबुराव होन्ना**

श्री सिध्देश्वर वरिष्ठ महाविद्यालय, माजलगाव

**शिक्षकेत्तर कर्मचारी - श्रीमती कावेरीबाई भगवान नांगराळे**

सेविका, श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई

**संस्था अंतर्गत प्रोत्साहनपर पुरस्कार - प्रा. सौ. मनिषा राघवेंद्र टोपरे**

श्री केशवराज उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर.

यानंतर पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे मनोगत झाले. प्रातिनिधिक स्वरूपात सौ. जयश्री ईटकूरकर व श्री. सुनील वसमतकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

भा.शि.प्र. संस्थेचे सन्माननीय कार्यवाह मा.श्री. नितीनजी शेटे यांनी पुरस्कार प्राप्त शिक्षक कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच पुरस्कारामागची संस्थेची भूमिका स्पष्ट केली.

**अध्यक्षीय समारोप - मा.श्री. विकासराव डुबे**

पुरस्कार प्राप्त सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. यापासून सर्वांनी प्रेरणा घेऊन कार्य करावे. नियोजित कार्यक्रम, उपक्रम तर आपण सर्वजण करतोच पण या व्यतिरिक्त आपल्या कार्याची ऊर्जा विद्यार्थ्यांना माणूस बनविण्यासाठी उपयोगात आणावी. वैयक्तिक पद्य श्री. जयेंद्र कुलकर्णी यांनी सादर केले.

**प्रमुख मार्गदर्शन - मा.श्री. योगेशजी सोमण**

अतिशय कमी कालावध्सीत काटेकोरपणे नियोजन पूर्ण करणाऱ्या सर्वांचे कौतुक केले. पुरस्कार प्राप्त होणे म्हणजे शाबासकी नसते. तर स्वतः प्रमाणे कार्यकर्ते तयार करण्याची जबाबदारी यातून वाढते. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्व विकासामुळे शाळा, संस्था समाजात नावारूपाला यावी आणि असे गुणवंत, प्रज्ञावंत विद्यार्थी शाळेने, संस्थेने घडवावेत.

## शिक्षण शिबीर शोध बोध

सजग सपूत समर्थ बनें हम, कभी सूर्य यह अस्त न हो ।
अमृत पुत्रों के रहते फिर, भारत माता त्रस्त न हो ।
यह स्वातंत्र्य फले और फूले, सदा रहे अमृत अक्षय ।।
मुक्त कंठ से दसों-दिशा में, गुंजे भारत माँ की जय ।।

भारतीय शिक्षण प्रसारक म्हणजेच राष्ट्रीयत्वाचा प्रसार करणारे मंडळ, संस्था आहे. 'आझादी का अमृतमहोत्सव' संपूर्ण देशभरात साजरा होत असताना आपण देखिल उत्साहाने आणि आनंदाने यात सहभागी होणारच.

या अनुषंगाने संस्कार केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक, समाज यांच्यासाठी शिक्षणसंस्था, पदाधिकारी, शिक्षक या भूमिकेतून सक्रियपणे नक्कीच काहीतरी देवू शकतो. या आत्मविश्वासाने राष्ट्र चेतना या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित हे त्रैवार्षिक शिक्षण शिबीर विद्यासभेने आयोजित केले आहे.

'राष्ट्रचेतना' या विषयी माहिती, चिंतन, प्रेरणा, स्मरण आणि कृतीयुक्त सहभागी होण्यासाठी संस्थेतील शिक्षक कार्यकर्ता, पदाधिकारी यांचे दोन दिवसीय एकत्रीकरण झाले.

या सत्रातील मार्गदर्शक वक्ते हे शिक्षणक्षेत्राशी संबंधित होते यामुळे नेमकेपणाने शिक्षकांच्या भूमिका, कार्यविस्तार व त्याची योग्य पध्दत आणि उद्दीष्ट्ये समर्पक मांडण्यात आली. राष्ट्रीय प्रतिकांची माहिती व त्यांचा आदर हे ज्ञान देणारे सत्र तर राष्ट्रीय गीतांच्या माध्यमातून, इतिहासाने, देशभक्तीची ज्योत पेटवली. चढत्या क्रमाने सत्राची मांडणी आणि विचार तात्विक बैठक यामुळे पहिल्या दिवशीचे शेवटचे सत्र तर समर्पक समारोपच होता.

स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांचे स्मरण करणे म्हणजे पुढील कार्यासाठी शिक्षकांना अधिक जोमाने, आत्मविश्वास निर्माण करणारे, नवीन आव्हान पेलण्यासाठी जबाबदारी स्वीकारण्यासाठी प्रेरक होते.

काम करत असताना अपयश, अडचणी, येणारच त्यालाही सामोरे जाता आले पाहिजे ही आपल्या संस्थेची परंपरा अआणि असे शिक्षक कार्यकर्ते घडविणे ही आपल्या पूर्वसुरीची पध्दत आहे.

कुलधर्म, कुलाचार नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संस्था, कार्यकर्ता, विकसता विकसता विकसावे या सत्रामधून अतिशय समर्पक झाले.

केवळ बोलून चालणार नाही तर काळाची पावले. ओळखून निरंतर, नवीन बदल स्वीकारत आम्ही पुढे जात आहोत. याचा प्रत्यय रेनिसन्स सीबीएसई स्कूल नूतन इमारत लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने आला. भौतिक सुविधा आवश्यकते नुसार करता येतात, होत असतात.

आदर्श शिक्षक पुरस्कार, सेवानिवृत्तांचा गौरव, विशेष सत्कार यामधून लक्षात येते की, परिश्रमांची योग्य उपक्रमांचे कौतुक केले जाते. ही प्रेरणा अनेकांना मिळते. संस्था, विद्यासभा पदाधिकाऱ्यांच्या रचनेतून, शिक्षकांनी, शिक्षकांसाठी केलेल्या नियोजित प्रयत्नांतून अनेक व्यवस्था निर्माण केल्या जातात आणि एक अविस्मरणीय नियोजनाचे कौशल्य, एकत्रिकरण घडवून आणले जाते.

शिक्षकांसाठी हितैषींच्या चिंतनातून साकारलेल्या विकसता विकसता विकसावे या उक्तीनुसार शिक्षक विकसीत तर होतीलच, पण त्यांचे विकसन विकसीत व्हावे, अर्पित होवून जावे या नुसार देशाप्रती अर्पित होवून जीवनवृत्ती होईल हा विश्वास संस्थेला आहे. संस्थेच्या या विश्वासातूनच शिक्षकांचे विकसन होत आहे.

धन्यवाद!